**<u>नियमित दिवाणी दावा क्र.११९२/२०२३ मधील निशाणी क्र.४६ वरील आदेश</u>**
<u>(कमलबाई व इतर वि. बब्रुवान व इतर)</u>
<u>(CNR NO.MHLA060026592023)</u>

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.२, ६ व ७ यांनी त्यांच्याविरुद्ध झालेले 'विना कैफियत' दावा चालविण्याचे आदेश रद्द होण्यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** अर्ज, त्यावरील वादी यांच्या म्हणण्याचे अवलोकन केले.

**३.** प्रतिवादी क्र.२, ६ व ७ यांनी अर्जात असे कथन केले आहे की, ते प्रकरणात हजर झालेले आहेत. परंतु वादी यांनी दाव्यात विविध कागदपत्राचा उल्लेख केलेला आहे. त्याबाबत आवश्यक असणारी महत्वाची कागदपत्रे प्रतिवादी यांना वेळेवर प्राप्त न झाल्याने प्रतिवादी हे सदर प्रकरणात त्यांचा लेखी जबाबदावा मुदतीच्या आत दाखल करु शकले नाहीत. सबब, प्रतिवादी क्र.२ व ६ त्यांच्याविरुद्ध दि.०८.०२.२०२४ रोजी व प्रतिवादी क्र. ०७ त्याच्या विरुध्द दि. १३.११.२०२५ रोज 'विना लेखी जबाबदावा' चालविण्याचा आदेश पारित केलेला आहे. प्रतिवादी क्र.२, ६ व ७ यांची कैफियत कोर्टासमोर आल्यास न्यायदानास निश्चित मदत होणार आहे. सबब, ते आदेश रद्द करण्यात यावे.

**४.** वादी यांनी असा प्रतिवाद केला की, प्रतिवादी क्र. २, ६ व ७ यांनी विना लेखी जबाबदावा चालविण्याचा आदेश रद्द करण्यासाठी कोणतेही कायदेशीर व समाधानकारक कारण दिलेले नसल्यामुळे सदरील अर्जावर आक्षेप घेतला आहे व सबब अर्ज नामंजुर करण्याची विंनती केली आहे.

**५.** अर्ज दि.०६.०२.२०२६ रोजीचा आहे. प्रतिवादी क्र.२ व ६ यांना दि. ०२.११.२०२३ आणि प्रतिवादी क्र. ७ यांना दि. ०३.०७.२०२५ रोजी समन्सची बजावणी झालेली आहे. प्रतिवादी क्र. ७ यांनी अर्जामध्ये नमुद केलेले कारण लक्षात घेता विलंब संयुक्तीक वाटतो. परंतु, प्रतिवादी क्र. २ व ६ यांना झालेला विलंबाचे कारण सयुंक्तीक वाटत नाही. परंतू दाव्यात कामकाज गुणदोषावर चालविण्याकरीता प्रतिवादी यांना संधी देणे आवश्यक वाटते. विलंबामुळे दाव्याचे कामकाज लांबणीवर पडलेले आहे. विलंब पैशाने भरुन काढता येवू शकतो. म्हणून, अर्ज खर्चासह मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश;

**<u>आदेश</u>**

१. अर्ज खालीलप्रमाणे खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.२ व ६ विरुद्ध झालेला 'विना कैफियत' दावा चालविण्याचा आदेश खर्च प्रत्येकी रुपये २५००/— वादी यांना दिल्यानंतर रद्द करण्यात येतो.

३. प्रतिवादी क्र.७ विरुद्ध झालेला 'विना कैफियत' दावा चालविण्याचा आदेश खर्च रुपये ३००—/ वादी यांना दिल्यानंतर रद्द करण्यात येतो.

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2026.02.25 16:06:06 +0530

दि.२५.०२.२०२६.

(स्वानंदी दे. वडगांवकर)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
अहमदपूर, जि.लातूर.